दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक ९६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.३० जून २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने केले अंमली पदार्थ विरोधात कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नशा मुक्त नवी मुंबई व अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहिमेंतर्गत गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या पथकाने एका इसमाविरुद्ध गांजा सेवन करण्याप्रकरणी कारवाई केली आहे.

गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे वपोनि गिरीधर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सचिन पवार हा संबंधित गुन्ह्याबाबत अधिक माहिती घेत असताना खास बातमीदारामार्फत त्यांना माहिती मिळाली की, शहराजवळील वडघर येथील एका रिकाम्या झोपडीमध्ये अकील अमरुद्दीन शेख (४५) हा त्या ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन करीत आहे. त्यानुसार सहा.पो. निरीक्षक प्रवीण फडतरे, पो.उपनिरीक्षक मानसिंग पाटील, सहा.निरीक्षक सुनील साळुंखे, पो.हवा.सचिन पवार, पो.हवा.प्रशांत काटकर, पोलीस नाईक डोंगरे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून त्या इसमाला ताब्यात घेवून त्याच्याविरुद्ध एनडीपीसी कायदा कलम ८ (क), २७ अन्वये कारवाई केली आहे.

# बीडीडी चाळ पुनर्विकासात कुणीही बेघर होणार नाही याची काळजी घ्या : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकासात कुणीही बेघर होणार नाही. चाळीतील प्रत्येकाच्या पुनर्वसनाची काळजी घेतली जाईल. याठिकाणच्या पोलिसांच्या निवासस्थानांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मंत्रीस्तरीय समिती स्थापन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. पोलीसांच्या निवासस्थानांबाबत पुनर्विकास आणि पुनवर्सन यांच्या अनुषंगाने आराखडा तयार करण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यानी यावेळी दिल्या.**



मुख्यमंत्र्याच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी बीडीडी चाळ पुनर्विकासाबाबत मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीस गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड, पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे, मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मनुकूमार श्रीवास्तव, मुंबईचे पोलीस आयुक्त हेमंत नगराळे, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष अनिल डिग्गीकर यांच्यासह माजी आमदार सर्वश्री सचिन अहिर, सुनिल शिंदे, नगरसेवक आशिष चेंबुरकर आदी उपस्थित होते.

बीडीडी चाळ पुनर्विकासात पोलिसांना वाटप झालेल्या निवासस्थानातील दिवंगत कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना घरे उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने या बैठकीत चर्चा झाली. मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले की, बीडीडी चाळ पुनर्विकासात कुणालाही पुनर्वसनापासून वंचित ठेवले जाणार नाही. बीडीडी चाळीचा पुनर्विकास हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. त्यामुळे तो सुनियोजितपणे पूर्ण होईल असे प्रयत्न आहेत. याठिकाणी पोलीस दलाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या निवासस्थानांपैकी काही निवासस्थाने दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांकडे आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडेही आहेत. पुनर्विकासात पोलिसांच्या सेवा निवासस्थानांची संख्या अबाधित ठेवून, सध्या वास्तव्यास असलेल्या पोलिसांच्या कुटुंबांबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करावा लागेल. त्यांच्यासाठी विविध पर्यायांतून घरे उपलब्ध होतील असे नियोजन करावे लागेल. पुनर्विकासातून म्हाडाच्या माध्यमातून उपलब्ध होणारी घरे आणि त्यांचे या पोलिसांकरिता करावे लागणारे वाटप याबाबत आराखडाही तयार करण्यात यावा. मंत्रीस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत तसेच पुनर्विकास आणि पुनर्वसन यांच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

## संक्षिप्त...

### अनिल देशमुख यांना ईडीने दिली २४ तासांची मुदत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे वादात सापडलेले राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांची आज (मंगळवार,२९ जून) सक्तवसुली संचालनालयाकडून (ईडी) चौकशी केली जाणार होती. त्यासाठी सकाळी ११ वाजता त्यांना कार्यालयात हजर राहण्याचे समन्स देखील बजाविण्यात आले होते. मात्र अनिल देशमुख यांनी ईडी चौकशीला प्रत्यक्ष हजर राहण्यास असमर्थता दर्शवली आहे.

वय, आजारपण आणि कोरोनाच्या धोक्याचं कारण पुढे करत अनिल देशमुखांनी ईडीच्या चौकशीला हजर राहण्यास नकार दिला. त्याऐवजी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आपला जबाब नोंदवण्याची तयारी त्यांनी दाखवली आहे. अनिल देशमुख यांनी अंमलबजावणी संचलनालयाच्या अधिकाऱ्यांना पत्र लिहून आपली बाजू मांडली आहे. अनिल देशमुख यांच्या या भूमिकेनंतर ईडीने पुन्हा त्यांना निरोप धाडला आहे. चौकशीसाठी कार्यालयात २४ तासांत हजर राहा, अन्यथा घरी येऊन चौकशी करणार, असं ईडीने अनिल देशमुख यांना म्हटलं आहे. त्यामुळे आता अनिल देशमुख नक्की कोणती भूमिका घेणार, याकडे लक्ष लागले आहे. तत्पूर्वी, ईडीने २५ जूनला समन्स बजावून मला दुसऱ्या दिवशी चौकशीला हजर राहण्याचे आदेश दिले होते. ईसीआयआरमध्ये उल्लेख केलेली कागदपत्रं मी प्रतिनिधींकडून पाठवत आहे. माझं वय ७२ वर्ष आहे, आजारपण आणि कोरोना होण्याच्या धोक्यामुळे मी हजेरी लावू शकत नाही. त्याऐवजी माझा जबाब ऑनलाईन रेकॉर्ड करा. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे मी जबाब नोंदवेन. मात्र त्याआधी ईडीने प्रश्नांची कॉपी पाठवावी अशी मागणी अनिल देशमुखांनी पत्राद्वारे केली आहे.

## पनवेल महानगरपालिकेच्या आयुक्तपदी गणेश देशमुख

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकाचे आयुक्त सुधाकर देशमुख यांची बदली करण्यात आली आहे. ते भिवंडी-निजामपूरचे नवे महापालिका आयुक्त असतील. त्यांच्या जागी पूर्वीचेच आयुक्त गणेश देशमुख यांच्या हाती पनवेल महापालिकेचा कारभार देण्यात आला आहे. पनवेल महापालिका हद्दीत कोरोना संसर्ग झपाट्याने वाढत असताना कोरोना प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी गणेश देशमुख यांच्या हाती पुन्हा पनवेल महापालिकेच्या आयुक्तपदाची जबाबदारी देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिलीय.

ऑक्टोबर २०१६ साली पनवेल महापालिकेची स्थापना करण्यात आली. डॉ. सुधाकर शिंदे हे पनवेल महापालिकेचे पहिले आयुक्त आणि प्रशासक होते. निवडणुकीच्या कालावधीमध्ये राजेंद्र निंबाळकर यांच्याकडे तात्पुरता पदभार देण्यात आला. त्यानंतर पुन्हा डॉ . शिंदे यांनी कार्यभार स्वीकारला. पुढे त्यांची महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी



म्हणून नियुक्ती करण्यात आली. तर नांदेड महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांची या ठिकाणी बदली करण्यात आली. देशमुख यांनी पनवेलमध्ये कोरोना काळात चांगलं काम केलं. नव्याने स्थापन झालेल्या पनवेल मनपा प्रशास-नाचा कारभार त्यांनी चांगल्या पद्धतीने चालवला. मागील वर्षी ऐन कोरोना सुरुवात होण्याच्या वेळी त्यांची ठाणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पदी नियुक्ती करण्यात आली होती.

गणेश देशमुख यांची बदली झाल्यानंतर सुधाकर देशमुख हे पनवेलचे नवे आयुक्त झाले. त्यांनी कोरोनात प्रतिकूल परिस्थिती चांगले काम केले. त्याचबरोबर विकास कामे सुद्धा मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. मालमत्ता कराचा निर्णय त्यांच्याच कार्यकाळात झाला. मात्र त्याला सर्वसामान्य जनतेकडून विरोध झाला. दरम्यान मंगळवारी शासनाने अध्यादेश काढून सुधाकर देशमुख यांची भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या आयुक्त पदी बदली केली. त्यांच्या जागेवर या ठिकाणी काम केलेल्या गणेश देशमुख यांची फेरनियुक्ती करण्यात आली आहे. गणेश देशमुख यांच्यासमोर मालमत्ता कराची वसुली हे मोठे आव्हान असणार आहे. गणेश देशमुख यांच्याकडे प्रशासनाचा मोठा अनुभव आहे. ते उत्तम प्रशासक म्हणून ओळखले जातात. पनवेल महापालिकेचा कारभार त्यांनी उत्तमरित्या हाताळलेला आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यामध्ये समन्वय साधून त्यांनी काम केलं आहे. कोरोनाच वैश्विक संकट योग्यरित्या हाताळण्याच्या अनुषंगाने त्यांची महापालिकेच्या आयुक्त पदी फेरनिवड करण्यात आल्याचं बोललं जात आहे.

## स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळ्याच्या बेटाचे सुशोभीकरण करून उंची वाढवावी : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर पुतळ्याच्या बेटाचे सुशोभीकरण करून उंची वाढवण्याची मागणी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम जनार्दन म्हात्रे यांनी आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



पनवेल शहरातील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर चौक येथे पालिकेमार्फत सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे पुतळ्याच्या वाहतूक बेटाची उंची कमी झा-लेली दिसून येत आहे. उंची कमी झाली कारणामुळे चौकाचे सौंदर्य हरवुन गेले आहे. त्यामुळे येथील पुतळ्याच्या बेटाचे सुशोभीकरण करावे आणि त्यांची उंची वाढवण्यात यावी अशी मागणी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेवक गणेश चंद्रकांत कडू, नगरसेविका सुरेखा विलास मोहोकर, प्रीती जॉर्ज, सारीका भगत यांनी आयुक्तांकडे केली आहे.

## जेएनपीटी वसाहतीमधील रहिवाशांच्या नशिबी नरक यातना

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

जेएनपीटी बंदराच्या वसाहती मधिल मेंटेनन्सचे अधिकारी हे रहिवाशांच्या तक्रारीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे पावसाळ्यात उद्भवणाऱ्या अनेक समस्यांचा सामना नाहक येथील रहिवाशांना करावा लागत आहे. तरी जेएनपीटी बंदराचे चेअरमन संजय सेठी यांनी वसाहती मधिल मेंटेनन्सचे अधिकारी यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी रहिवाशांकडून करण्यात येत आहे.

जेएनपीटी बंदरातील कामगारांच्या कुटुंबीयांना राहण्यासाठी उत्तम दर्जाची, सुसज्ज, सुविधा युक्त वसाहत असावी यासाठी जेएनपीटी बंदराच्या प्रशासनाने नवघर आणि जसखार ग्रामपंचायत हद्दीत सेक्टर १,२, आणि ३ या अनुषंगाने चार मजली इमारतीची उभारणी २५ वर्षांपूर्वी केली. तसेच या इमारतीच्या दुरुस्तीचे काम जेएनपीटी बंदराच्या प्रशासनाने दोन वर्षांपूर्वी सुमारे १६५ कोटी रुपये खर्चून हाती घेतले. परंतु बंदरातील अधिकारी यांच्या डोळेझाक कारभारामुळे ठेकेदारांनी इमारतीच्या दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणात हेराफेरी करून नित्कृष्ट दर्जाचे काम केले. त्यामुळे दुरुस्ती करण्यात आलेल्या इमारतींना पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात गळती लागून इमारतीची पडझड सुरू झाली आहे.

त्यात जेएनपीटी वसाहती मधिल मेंटेनन्सचे अधिकारी वर्ग हे रहिवाशांच्या तक्रारीकडे जाणूनबुजून



दुर्लक्ष करत असल्याने इमारती परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. घाणी बरोबर मळ मिश्र दुर्गंधी युक्त पाणी इमारती परिसरात पसरत असल्याने रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यात पावसाळ्यात झाडे, झुडपे आणि गवत वाढल्याने सरपटणाऱ्या प्राण्यांचा वावर इमारती परिसरात होऊ लागला असून रहिवाशांबरोबर परिसरात .../२

## निसर्गसुंदर न्हावा बेटाचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी सिडकोतर्फे स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडकोच्या अखत्यारितील न्हावा बेटावरील ६० हेक्टर क्षेत्रावर पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी सिडकोतर्फे स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. करंजाडे व ठाणे खाडी किनाऱ्याने तिन्ही बाजूने वेढलेल्या व समोर ऐतिहासिक एलिफंटा लेण्यांचे दर्शन घडवणाऱ्या या बेटाचे पर्यटन स्थळाच्या अनुषंगाने विकास करण्याचे सिडकोने नियोजित केले आहे. या माध्यमातून महाराष्ट्रासोबतच नवी मुंबईतदेखील पर्यटन क्षेत्राच्या विकासात मोठी भर पडणार आहे.

सदर बेट हे सध्या विकसित होत असलेल्या उलवे नोडपासून केवळ ५ कि.मी. अंतरावर आहे. तसेच मुंबई ट्रान्सहार्बर लिंकपासूनदेखील नजीकच्या अंतरावर आहे. ६० हेक्टरपैकी ३० हेक्टर क्षेत्र हे सीआरझेड - २ अंतर्गत येत असल्याने व नवी मुंबई विकास आराखड्यानुसार रीजनल पार्क झोनमध्ये याचा समावेश असल्याने या बेटाचा पर्यटन व विविध प्रकारच्या सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमासाठी विकास करण्याचा प्रस्ताव सिडको महामंडळाच्या विचाराधीन आहे.




सदर प्रस्तावासाठी इच्छुक गुंतवणूकदार व खरेदीदारांमध्ये या प्रकल्पाविषयी उत्सुकता निर्माण व्हावी तसेच त्यांच्याकडून विविध सूचना व अभिप्राय प्राप्त करण्यासाठी सिडकोतर्फे स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव प्रकाशित करण्यात आला आहे. .../२


> सिडकोच्या प्रयत्नांमुळे न्हावा बेट हे नवी मुंबईतील पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरेल यात काही शंका नाही. या प्रकल्पामुळे नवी मुंबई सोबतच महाराष्ट्राचे नावदेखील पर्यटन क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतले जाईल.
>
> **डॉ. संजय मुखर्जी**
> **उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक**

## २ फूट उंचीची मूर्ती, विसर्जनही घरच्या घरी; गणेशोत्सवासाठी राज्य सरकारची नियमावली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता या वर्षीचा सार्वजनिक गणेशोत्सव(२०२१) साध्या पध्दतीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने गृहविभागाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

'ब्रेक दि चेन'च्या अनुषंगाने लागू करण्यात आलेल्या निर्बंधपातळीबाबत (Level of Restrictions for Break the Chain) वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार इतर निर्बंध कायम राहतील. त्यामध्ये गणेशोत्सवानिमित्त कोणतीही शिथीलता देता येणार नाही असेही या परिपत्रकात नमुद करण्यात आले आहे.



सार्वजनिक गणेशोत्सवासाठी गणे-शोत्सव मंडळांनी महापालिका, स्थानिक प्रशासन यांची त्यांचे धोरणानुसार यथोचित पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता महापालिका तसेच संबंधित स्थानिक प्रशासनाचे मंडपांबाबतचे धोरण यांचेशी सुसंगत असे मर्यादित स्वरुपाचे मंडप उभारण्यात यावेत. यावर्षीचा गणेशोत्सव साध्या पद्धतीने साजरा करणे अपेक्षित असल्याने घरगुती तसेच सार्वजनिक गणपतींची सजावट करतांना त्यात भपकेबाजी नसावी.

श्रीगणेशाची मूर्ती सार्वजनिक मंडळांकरिता ४ फूट व घरगुती गणपतीकरिता २ फूटांच्या मर्यादेत असावी. यावर्षी शक्यतो पारंपारिक गणेशमुर्तीऐवजी घरातील धातू / संगमरवर आदी मूर्तीचे पूजन करावे. मूर्ती शाडूची/ पर्यावरणपूरक असल्यास त्याचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे. विसर्जन घरी करणे शक्य .../२

## पनवेलमध्ये अखिल भारतीय समता परिषदेचे रास्ता रोको आंदोलन

### कळंबोली पोलिसांनी आंदोलकांना घेतले ताब्यात ; ओबीसींचे राजकीय आरक्षण पूर्ववत करण्याची मागणी




**दै.रायगड नगरी । पनवेल**

ओबीसींचे स्थानिक स्वराज्य संस्थेतील रद्द केलेले राजकीय आरक्षण पूर्ववत करावे व ओबीसींची जातनिहाय जनगणना करावी, या प्रमुख मागण्यांसह विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद कोकण विभाग व रायगड जिल्ह्यातील सर्व ओबीसी संघटना यांच्यावतीने पनवेलमध्ये रास्ता रोको आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी सायन-पनवेल महामार्गावर कळंबोली मॅकडोनाल्डजवळ कार्यकर्त्यांनी रस्ता अडवण्याचा प्रयत्न केला. रस्ता अडवण्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. 'एकच चळवळ छगन भुजबळ- छगन भुजबळ', 'उठ ओबीसी जागा हो आर-क्षणाचा धागा हो' अशा विविध घोषणा देत समता परिषदेचे पन्नास ते शंभर कार्यकर्ते यावेळी रस्त्यावर उतरले होते.

कळंबोली पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेऊन नंतर सोडून दिले. ओबीसींच्या बचाव समर्थनार्थ तसेच ओबीसींच्या जनगणने संदर्भातील इम्पेरियल डेटा केंद्र सरकारने उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन करण्यात आले असल्याचे अखिल भारतीय समता परिषदेचे बाळू भुजबळ यांनी सांगितले.

ते पुढे बोलताना म्हणाले की, राजकीय सरकारमधील .../२

# नवे दहशती फूत्कार

पंतप्रधानांनी प्रदीर्घ विरामानंतर काश्मिरी नेत्यांशी संवाद साधावा आणि त्यानंतर दोनच दिवसांत जम्मूत हवाई दलाच्या तळावर ड्रोन हल्ला व्हावा, हा काही योगायोग नाही. काश्मीर व भारत कायम अशांत राहावा आणि काश्मिरी जनतेचा कथित स्वातंत्र्यलढा जगाच्या अजेंड्यावरून कधीही अदृश्य होऊ नये, यासाठी असे हल्ले होत राहणारच. यावेळचे वेगळेपण म्हणजे पाकिस्तानात आश्रय घेतलेल्या दहशती संघटनांनी प्रथमच ड्रोनचा वापर केला आहे. जगभरात दहशतवादी गेली अनेक वर्षे दूरनियंत्रित आणि जीपीएसचा वापर करून ड्रोन वापरत आहेत. सौदी अरेबियात येमेनी दहशतवाद्यांनी अरामको तेल कंपन्यांचे दोन तेलशुद्धीकरण प्रकल्प ड्रोन हल्लयांनी अलीकडेच प्रचंड क्षतिग्रस्त केले होते. जगभरातल्या सगळ्या दहशतवाद्यांकडे आता ड्रोन आहेत आणि कधी कधी छोटे ड्रोन रडार चुकविण्यात यशस्वी होतात. जम्मूमध्ये जे दोन ड्रोन हल्ले झाले, त्यात तुलनेने कमी नुकसान झाले. एक ड्रोनवर बसवलेला बाँब न फुटता निकामी करण्यात यश आले. असे असले तरी हा भारतीय सुरक्षा दलांना मिळालेला मोठा इशारा आहे. केंद्र सरकार एकीकडे चर्चेची दारे उघडत असले, तरी पाकिस्तानात आश्रय घेतलेले दहशती गट अनेक प्रकारच्या मोहिमा आखत आहेत. त्यातली एक म्हणजे, जम्मू-काश्मीरची राजधानी असणारे श्रीनगर शांत राहू द्यायचे नाही. श्रीनगरमध्ये मोठ्या प्रमाणात सुरक्षा दले असली तरी अचानक एखाद्या दुकानदार किंवा कर्मचाऱ्याला लक्ष्य करून त्याची हत्या करणाऱ्या दहशतवाद्यांना रोखणे फार कठीण आहे. त्यासाठी, जम्मू-काश्मीरमधील सगळी बेकायदा शस्त्रे एकतर हाती लागायला हवीत आणि सीमेपलीकडून होणारा दहशतवाद्यांचा शिरकाव पूर्णपणे थांबायला हवा. हे दोन्हीही अद्याप झालेले नाही. जम्मूत जेथे हल्ला झाला, ते ठिकाण सध्याच्या सीमेपासून फार दूर नाही. पाच वर्षांपूर्वी पाकिस्तानने पठाणकोट येथील हवाई दलाच्या तळावर हल्ला केला होता. त्याचे प्रत्युत्तर भारताने हवाई प्रतिहल्ला करून दिले होते. ड्रोन हल्ला हा ही पाकिस्तान सरकारने पुरस्कृत केलेला दहशतवादी हल्ला आहे, असे मानून भारतीय हवाई दल अधिक कठोर उत्तर देणार का, हे कळायला फार वेळ लागणार नाही. गेल्या काही महिन्यांमध्ये पाकिस्तान गुप्तचर यंत्रणा तसेच पाकिस्तानातील काही राजनैतिक वर्तुळातील उच्चपदस्थांशी तिसऱ्या देशात अनौपचारिक चर्चा सुरू झाल्याच्या बातम्या येत होत्या. अमेरिकेचे नवे अध्यक्ष बायडेन यांनी शपथ घेतल्यानंतर कदाचित या प्रयत्नांना थोडा वेगही आला असेल. कोणत्याही औपचारिक चर्चा किंवा संवादाच्या आधी अशी बोलणी होतच असतात. त्यात काही गैर नाही. मात्र, या बोलण्यांमुळे मोदी सरकारने आधी पाकिस्तानवर जो दबाव टाकला होता, तो उणावला तर नाही ना, असा प्रश्न या नव्या हल्लयामुळे नक्कीच निर्माण होणार आहे. काही दिवसांपूर्वीच, फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स या आर्थिक मदतीचे नियंत्रण करणाऱ्या जागतिक संस्थेने पाकिस्तानला 'ग्रे' यादीतून बाहेर काढण्यास नकार दिला होता. त्यावर पाकिस्तानने आता 'देशातील सगळ्या दहशतवादी गटांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणू' असे एक पिल्लू सोडून दिले आहे. शेजारच्या अफगाणिस्तानात अमेरिकेने इतकी वर्षे तळ ठोकूनही तालिबानचे नि:शस्त्रीकरण हे निव्वळ स्वप्न राहिले. या पार्श्वभूमीवर इम्रान खान यांचे लष्कराच्या हातातले कळसूत्री सरकार दहशती गटांना मुख्य प्रवाहात कसे आणणार आणि त्यांच्याजवळचा अतिप्रचंड शस्त्रसाठा तरी कसा परत मिळवणार? किंबहुना, तशी इम्रान सरकारची किंवा आयएसआयची प्रामाणिक इच्छा तरी असणे शक्य आहे का? असे असताना भारताला जम्मू-काश्मीर-लडाख यांची पश्चिम तसेच पूर्व सीमा ही काही प्रमाणात कायमच अशांत राहणार, हे गृहीत धरूनच या द्विभाजन केलेल्या राज्यात विकास करत राहावा लागणार आहे. आज जम्मू-काश्मीर केंद्रशासित असल्याने स्थानिक राजकीय नेते व पक्ष यांच्या दहशती संघटनांशी असणाऱ्या सहकार्यात अडथळे येत आहेत. 'आम्ही पूर्ण राज्याची मागणी सोडलेली नाही' हा उमर अब्दुल्ला यांचा बैठकीनंतरचा दावा म्हणूनच महत्त्वाचा आहे. ड्रोन हल्ले चढवून लष्कर-ए-तय्यबाने काश्मीरमधील राजकीय पक्ष आणि नेत्यांनाही केंद्र सरकारला जास्त सहकार्य करू नका, असा इशारा दिला आहे. या हल्लयांमध्येच काश्मीरमधील मतदारसंघांची फेररचना आणि पुढील निवडणुका यांनाही दिलेला इशारा अनुस्यूत आहे. भारतीय राज्यघटनेतील ३७० कलम गेल्यानंतर काश्मीरमधील मुख्य प्रवाहातील राजकीय पक्ष, इतर राजकीय संघटना आणि दहशतवादी संघटना या साऱ्यांची भूमिका जणू एकसमान झाल्यासारखे चित्र निर्माण झाले आहे. ही राजकीय कोंडी अजून फुटलेली नाही. तसे प्रयत्न परवाच्या बैठकीत झाले असतील तर त्यांना या ड्रोन हल्लयांनी नवा धक्का बसला आहे. पूर्व सीमेवरच्या चीनशी असणाऱ्या कटकटी कायम असल्या तरी या ड्रोन हल्लयांना तिखट उत्तर देण्यासाठी सरकारवर अनेक मार्गांनी दबाव येण्याची शक्यता आहे. तसे उत्तर दिले गेलेच तर राजकीय प्रक्रिया लांबणीवर पडण्याचा धोकाही सरकारला पत्करावा लागेल.

# कोविडमुळे निराधार झालेल्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्य शासनासोबत एनजीओंचे सहकार्य मोलाचे : ॲड.यशोमती ठाकूर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोविडमुळे अनाथ झालेल्या मुलांच्या शालेय शुल्काची जबाबदारी आणि मुलांच्या समुपदेशनाची मोहीम स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून शासन हाती घेत आहे. या संदर्भात महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या उपस्थितीत महिला व बालविकास विभाग आणि प्रोजेक्ट मुंबई तसेच इंडियन सायकियाट्रिक सोसायटी या संस्थांसोबत दोन सामंजस्य करार करण्यात आले.



कोविड-१९ आजारामुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांचे संरक्षण आणि संगोपनाची जबाबदारी पालकत्त्वाच्या नात्याने राज्यशासन समर्थपणे बजावत आहे. या बालकांना शैक्षणिक, व्यावसायिक प्रशिक्षण आदी सुविधा उपलब्ध करुन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध आहे. अशातच या मुलांच्या शिक्षणासाठी तसेच मानसिक पुनर्वसनासाठी सामाजिक जबाबदारी म्हणून स्वयंसेवी संस्था पुढे येत आहेत ही बाब प्रशंसनीय आहे, असे उद्गार यावेळी मंत्री ॲड. ठाकूर यांनी काढले. यावेळी महिला व बालविकास विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आय. ए. कुंदन, प्रोजेक्ट मुंबई या अशासकीय संस्थेचे (एनजीओ) मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संस्थापन शिषीर जोशी या प्रत्यक्ष तर महिला व बालविकास आयुक्त श्रीमती पवनीत कौर, महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्थेच्या कार्यक्रम व्यवस्थापक श्रीमती मनिषा बिरारीस, इंडियन सायकियाट्रिक सोसायटी वेस्टर्न झोनच्या प्रमुख श्रीमती अंजली छाब्रिया आदी ऑनलाईनरित्या उपस्थित होते.

कोरोना कालावधीत दोन्ही किंवा एक पालक गमावल्याचा लहान बालकांच्या भावविश्वावर सर्वाधिक गंभीर परिणाम झाला आहे, असे सांगून ड. ठाकूर म्हणाल्या, राज्यात आतापर्यंत दोन्ही पालक गमावलेली ४०० हून अधिक आणि एक पालक गमावलेल्या तेरा हजाराहून अधिक बालकांची माहिती शासनाला मिळाली आहे. दोन्ही पालक गमावलेल्या बालकांची माहिती जमा करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स गठित करण्यात आले आहे. त्यानुसार माहिती प्राप्त झालेल्या बालकांच्या खात्यावर राज्य शासनामार्फत ५ लाख रुपये मुदत ठेव स्वरुपात ठेवणार आहे. ही रक्कम जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात येणार असून मुलाचे वय १८ वर्षे झाल्यानंतर व्याजासह त्याला देण्यात येईल. तोपर्यंत दैनंदिन खर्चाच्या अनुषंगाने बालसंगोपन योजनेचा लाभ या बालकांना देण्यात येईल. तसेच या बालकांची मालमत्ता तसेच इतर कायदेशीर हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारीदेखील टास्क फोर्सच्या माध्यमातून पार पाडली जाईल.

ॲड. ठाकूर यांनी पुढे सांगितले, राज्यशासन या बालकांच्या पाठिशी ठामपणे उभे आहे. तथापि, स्वयंसेवी संस्थांनीही या कामात पुढाकार घेतल्यास बालकांचे पुनर्वसन गतीने होऊ शकेल. त्यादृष्टीने प्रोजेक्ट मुंबई या एनजीओने दोन पालक गमावलेल्या बालकांचे शैक्षणिक शुल्क भरण्याची जबाबदारी स्वीकारुन पुढाकार घेतल्याबद्दल मंत्री ॲड. ठाकूर यांनी संस्थेचे कौतुक केले. तसेच बालकांना मानसिक धक्क्यातून बाहेर काढण्यासाठी समुपदेशन सेवा आदी पुढाकारासाठी इंडियन सायकियाट्रिक सोसायटीबद्दलही गौरवोद्गार काढले.

# गीता पालरेचा यांनी केली कोंडगाव येथील ढासळलेल्या विहिरीची पाहणी



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रायगड जिल्हा महिला अध्यक्ष गीताताई पालरेचा यांनी मंगळवारी (दि.२९) कोंडगाव येथील ढासळलेल्या विहिरीची पाहणी केली. आणि ताबडतोब यासंदर्भात दुरुस्तीचा प्रस्ताव पालकमंत्र्यांकडे सादर करणार असल्याचे सांगितले. ग्रामस्थांची पाण्यासाठी गैरसोय होऊ नये म्हणून तात्पुरत्या स्वरूपात टँकरने किंवा इतर ठिकाणी मोटरपंप द्वारे पाणीपुरवठा करण्यासंदर्भात सूचना दिल्या आहेत.

सुधागड तालुक्यातील कोंडगाव येथील विहीर सोमवारी (दि.२८) पहाटे पूर्णपणे ढासळली आहे. विहिरीत चिखल व गाळ साठला आहे. त्यामुळे गावकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पाऊस असल्याने विहिरीचे काम आत्ता करणे शक्य नाही. शिवाय तेथे जेसीबी येऊ शकत नाही. तसेच बोअरवेल मारणे देखील शक्य नाही. त्यामुळे गावकऱ्यांनी एखादा पर्याय सुचविल्यास त्याद्वारे तात्पुरत्या स्वरूपात पाण्याची निकड भागविण्याचा प्रयत्न करू असे गीता पालरेचा यांनी सांगितले.

यावेळी गीता पालरेचा यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सुधागड तालुका युवक अध्यक्ष संदेश शेवाळे, ललित ठोंबरे, किरण खंडागळे, बी. सी. चव्हाण, दिपक घाडगे व कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# कोविड १९च्या प्रादुर्भावामुळे पालक मयत झालेल्या विद्यार्थ्यांचे पदवी/पदव्युत्तर पर्यंतचे पुर्ण शुल्क माफ : उदय सामंत

## विद्यापीठ आणि अनुदानित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे इतर शुल्क माफ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे ज्या विद्यार्थी-विद्यार्थीनींचे आई/वडील/पालक मयत झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे पदवी/पदव्युत्तर शिक्षण पुर्ण होईपर्यंतचे संपूर्ण शुल्क माफ करण्यात येत आहे, अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत केली.

मंत्री श्री.सामंत म्हणाले, अनुदानित महाविद्यालय व विद्यापीठीय विभागातील सर्व अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगेजीन शुल्क, संगणक शुल्क, क्रीडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टिवल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च आकारण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पुर्णपणे माफ करण्यात येणार आहे.

प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची देखभाल व ग्रंथालयामध्ये ई-कन्टेंट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने याबाबतच्या शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येईल. विद्यार्थ्यांद्वारे वसतीगृहाचा उपयोग करण्यात येत नसल्याने वसतीगृह शुल्कापोटी आकारण्यात येणारे शुल्क पुर्णपणे माफ करण्यात येईल.

विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांद्वारे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व विकास निधी यामध्ये सवलत देण्यात येणार नाही परंतु इतर शुल्कामधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगेजीन शुल्क, संगणक शुल्क, क्रीडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टिवल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च आकारण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पुर्णपणे माफ करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे प्रयोगशाळा व ग्रंथालय शुल्क यामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येईल, असेही श्री.सामंत यांनी सांगितले.

# दिघोडे येथील आरोग्य केंद्रांचा प्रश्न मार्गी लागणार ; जागेची मोजणी झाली आता बांधकामाची प्रतिक्षा

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

दिघोडे येथिल प्रस्तावित प्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. रायगड जिल्हा परिषदेने निश्चित केलेल्या जागेची सोमवार ता.२८ रोजी कोप्रोली आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाराम भोसले यांच्या आणि पोलिसांच्या उपस्थित मोजणी करण्यात आली.त्यामुळे गेली कित्येक वर्षापासून मंजूरी मिळालेल्या दिघोडे येथिल प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम सुरू होण्याची शक्यता दिसत आहे.

उरण तालुक्याचा सध्या औद्योगिक दृष्ट्या मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. या तालुक्याची ग्रामिण भागाची लोकसंख्या जवळ-जवळ दोन लाखाच्या आसपास आहे. शासनाच्या धोरणानुसार साधारणपणे तिस हजार लोकसंख्येला एक प्राथमिक आरोग्य केंद्र असणे गरजेचे आहे. मात्र उरण तालुक्यात कोप्रोली हे एकमेव प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. त्यामुळे कोप्रोलीच्या आरोग्य केंद्रावर मोठ्या प्रमाणात ताण येत असे. त्यामुळे तालुक्यात आणखी आरोग्य केंद्र उभारावित अशी मागणी सातत्याने स्थानिक लोकप्रतिनीधींकडून करण्यात येत होती. माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ मनिष पाटील,माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष ठाकूर व माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर यानी ते सदस्य असताना ही मागणी सातत्याने लावून धरली होती. पाच वर्षापूर्वी ही जागा जिल्हा परिषदेने ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केले होते. मात्र स्थानिक शेतकऱ्याने या जागेवर हरकत घेवून आपला अधिकार सांगितल्यामुळे हे काम थांबले होते. आत्ता मात्र तहसिलदारानी ही जागा शासनाची असल्याचा निर्णय दिल्यानंतर तातडीने या जागेची मोजणी करण्यात आली. लवकरच या जागेची हद्द निश्चित झाल्यानंतर तेथे प्रत्यक्षात कामाला सूरूवात होण्याची शक्यता आहे. पालकमंत्री आदिती तटकरे यांनी रायगड जिल्ह्यात आरोग्य सोयी निर्माण करण्याला प्राधान्य देत असून जिल्ह्यात अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि आरोग्य उपकेंद्रांसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. उरण तालुक्यातील आरोग्य सुविधांची परिस्थिती पहाता लवकरच याचे काम मार्गी लागेल आणि त्यासाठी आदिती तटकरे यांच्याकडे पाठपुरावा करू असे माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर यांनी सांगितले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## जेएनपीटी वसाहतीमधील रहिवाशांच्या नशिबी नरक यातना

बागडणाऱ्या मुलांच्या जिवीतास धोका निर्माण होऊ शकतो अशी भिंती रहिवाशी व्यक्त करत आहेत. तरी वसाहती मधिल रहिवाशांच्या समस्यांच निराकरण करण्यासाठी बंदराचे चेअरमन संजय सेठी यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी होत आहे.

## सिडकोतर्फे स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव

या प्रस्तावाद्वारे इच्छुक अर्जदारांना सदर प्रकल्पाविषयी संपूर्ण माहिती सिडकोच्या अधिकृत संकेतस्थळावर www.cidco.maharashtra.gov.in वर दिनांक २७ जून २०२१ पासून उपलब्ध करून देण्यात आली असून प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक २९ जुलै २०२१ पर्यंत आहे.

सदर प्रस्तावांतर्गत प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्रायांचा विचार पूर्व अर्हतेसाठी करण्यात येणार नाही. तसेच प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्रायांचा समावेश विनंती प्रस्तावात करण्याचे अथवा न करण्याचे अधिकार सर्वस्वी सिडको महामंडळ राखून ठेवत आहे.

## २ फूट उंचीची मूर्ती, विसर्जनही घरच्या घरी; गणेशोत्सवासाठी राज्य सरकारची नियमावली

नसल्यास नजिकच्या कृत्रीम विसर्जनस्थळी विसर्जन करण्यात यावे.उत्सवाकरिता वर्गणी/देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्वीकार करावा. जाहिरातींच्या प्रदर्शनामुळे गर्दी आकर्षित होणार नाही असे पहावे. तसेच आरोग्यविषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंती देण्यात यावी.

सांस्कृतिक कार्यक्रमांऐवजी आरोग्यविषयक उपक्रम / शिबिरे उदा. रक्तदान आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता यांबाबत जनजागृती करण्यात यावी. आरती, भजन, कीर्तन वा अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करतांना गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच ध्वनी प्रदुषणासंदर्भातील नियमांचे व तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. श्रीगणेशाच्या दर्शनाची सुविधा ऑनलाईन, केबल नेटवर्क, वेबसाईट व फेसबुक इत्यादीद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबत जास्तीत जास्त व्यवस्था करण्यात यावी. गणपती मंडपांमध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच थर्मल स्क्रीनिंगची व्यवस्था करण्यात यावी. प्रत्यक्ष येऊन दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी शारीरिक अंतराचे (फिजिकल डिस्टन्सींग) तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनीटायझर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे. श्रींच्या आगमन व विसर्जन मिरवणूका काढण्यात येऊ नयेत. विसर्जनाच्या पारंपारिक पध्दतीत विसर्जनस्थळी होणारी आरती घरीच करुन विसर्जनस्थळी कमीत कमी वेळ थांबावे. लहान मुले आणि वरीष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जनस्थळी जाणे टाळावे. संपूर्ण चाळीतील/इमारतीतील सर्व घरगुती गणेशमूर्तींच्या विसर्जनाची मिरवणूक एकत्रितरित्या काढण्यात येऊ नयेत. महापालिका, विविध मंडळे, गृहनिर्माण संस्था, लोक प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था इत्यादींच्या मदतीने गणेशमूर्तींच्या विसर्जनाकरिता कृत्रीम तलावांची निर्मिती करण्यात यावी.

कोविड- १९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महापालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करणे बंधनकारक राहील असेही गृहविभागाने स्पष्ट केले आहे.

## पनवेलमध्ये अखिल भारतीय समता परिषदेचे रास्ता रोको आंदोलन

ओबीसींचे आरक्षण पूर्ततेअभावी कमी करुन स्थगित करण्यात आले आहे. यासाठी कोणत्याही परिस्थितीत इम्पेरिअल डेटा उपलब्ध करून देण्याबाबत सुप्रीम कोर्टानेही निर्देश दिले आहेत. हे करीत असताना यासाठी आयोग निर्माण करावा, त्यानंतर एससी, एनटी नंतर जे उरेल ते आरक्षण दिले जावे, आरक्षण ५० टक्क्यांच्या वर जाऊ नये, याप्रमाणे तीन अटी घालण्यात आल्या आहेत.

यामुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद या सर्वांमधील राजकीय क्षेत्रासाठी असणारे ओबीसी आरक्षण जवळजवळ ५५ हजार उमेदवारांचे आरक्षण स्थगित झालेले आहे. यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या समन्वयाने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते. जोपर्यंत आम्हाला आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत ही लढाई अशीच सुरू राहणार आहे. कोणत्याही परिस्थितीत एकतर निवडणूका पुढे ढकला किंवा आम्हाला केंद्र सरकारकडून डेटा देण्यात यावा. केंद्र सरकार डेटा देत नसेल तर आम्ही डेटा गोळा करतो. त्यासाठी आम्हाला मुदत देण्यात यावी, अशी सुप्रीम कोर्टाला विनंती केलेली आहे. तसेच या प्रश्नाबाबत अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगन भुजबळ व राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी स्वतः लक्ष घातले असून प्रश्न सोडवण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. जोपर्यंत हा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत हे आंदोलन स्थगित केले जाणार नाही. संपूर्ण महाराष्ट्रातील खेडेगावात, शहरात, तालुक्यात, जिल्ह्यात हे आंदोलन मोठ्या प्रमाणात होत असून आमच्या न्याय हक्कांवर कोणी दबाव आणत असेल तर ते आम्ही सहन करणार नाह, असे वक्तव्य बाळू भुजबळ यांनी आंदोलनादरम्यान केले.


## ग्रुप ग्रामपंचायत चिपळे

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि.२९/०६/२०२१

प्रति,

अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत चिपळे हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.३०/०६/२०२१ ते ०७/०७/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.०८/०७/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | भोकरपाडा स्मशानभूमी नुतनीकरण करणे | जिल्हा वार्षिक योजना जनसुविधा योजना सन २०२०/२१ | ५०००००/- | ६ महिने |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये ५०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत चिपळे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत चिपळे**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## बबली फिटनेस जिम संभे कोलाडच्या वतीने १०० झाडांचे केले वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील संभे कोलाड येथील बबली फिटनेस जिम च्या वतनीने संभे परिसरात शंभर झाडांचे वृक्षारोपण बबली सानप हरेश सानप यांच्या नेतृत्वाखाली बबली फिटनेस ग्रुप आणि परिवार व आदी पर्यावरण यांच्या वतीने या परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली.

संभे येथील बबली सानप आणि हरेश सानप यांच्या विशेष सहकार्यातून हा वृक्षारोपण उपक्रम संपन्न करण्यात आले यावेळी बबली सानप, हरेश सानप, मित्र परिवार व पर्यावरण प्रेमी ग्रुप यांच्या यांच्या विशेष प्रयत्नातून हे वृक्षारोपण करण्यात आले. निसर्ग आणि मानव यांच्यातील स्नेहसंबंध फार पुरातन कालापासून आहे. अगदी अनादी कालापासून निसर्ग मानवाचा मित्र आहे. वृक्ष ही निसर्गाने मानवाला दिलेली देणगी आहे.त्याच धर्तीवर दररोज पर्यावरणात होत असलेला बदल व पर्यावरणाची सामाजिक बांधिलकीतुन हे वृक्षारोपण करत आहेत परंतु वृक्ष संपदा जोपासण्याची आजची गरज असल्याचे बबली सानप व हरेश सानप यांनी पर्यावरण प्रेमींना यावेळी संदेश देत संभे गाव परिसरात विविध प्रकारचे शंभर झाडांची लागवड करण्यात आली.

## उरण रेल्वे मार्गाची प्रतिक्षा

**दै.रायगड नगरी । उरण**

मध्य रेल्वे आणि सिडकोच्या भागीदारीतून उभारण्यात येत असलेल्या नेरुळ-उरण मार्गाच्या दुसर्याआ टप्याचे काम भूसंपादना अभावी रखडले आहे. या प्रकल्पासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात २० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. त्यामुळे भूसंपादनाचे काम लवकरच पुर्ण होऊन हा प्रकल्प प्रवाशांच्या सेवेत येण्याची अपेक्षा होती. परंतु ती फोल ठरली आहे.



सिडकोच्यावतीने १९९७ साली नेरुळ-उरण रेल्वे प्रकल्पाची घोषणा केली होती. २७ कि.मी. लांबीच्या या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला २०२१ मध्ये सुरुवात झाली. या प्रकल्पाचा ६७ टक्के खर्च सिडको आणि ३३ टक्के खर्च रेल्वे करीत आहे. ५०० कोटी रुपयांचा हा प्रकल्प रखडल्याने त्याचा खर्च आता सुमारे २ हजार कोटींच्या घरात पोहोचला आहे. ४ नोव्हेंबर २०१९ रोजी नेरुळ-उरण रेल्वे मार्गातील खारकोपरपर्यंत पहिल्या टप्यात रेल्वे सेवा सुरु झाली. सध्या मार्गावर लोकलच्या ८ फेर्याच धावतात. (टाळेबंदीआधी दररोज ४० फेर्यास). खारकोपर रेल्वे स्थानकामुळे उलवे नोड नवी मुंबईला जोडला गेला आहे. या प्रकल्पातील दुसर्या टप्यातील १४.६० किलोमीटरच्या खारकोपर ते उरण मार्गाचे काम सध्या सुरु आहे. मध्य रेल्वेने टाळेबंदीत हा मार्ग पुर्ण करण्यावर भर दिला आहे. परंतु ८ ते ११ किलोमीटरच्या दरम्यानची ४.४७९ हेक्टर वनजमिनीचा प्रश्न् आजही सुटलेला नसल्याने हा प्रकल्प रखडला आहे. दुसरा टप्पा पुर्णत्वाला आल्यास नवी मुंबई उरण प्रवास सुखकर होणार आहे. खारकोपर - उरण दरम्यान ५ स्टेशन, २ मोठे पुल, ४१ छोटे पुल, २ रोड अंडर ब्रिज आणि ४ रोड ओव्हर ब्रिज आहेत.

# कर्जतमध्ये पर्यटकांची फार्महाऊस पार्टी उधळली; ३४ जणांवर गुन्हे दाखल

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कोरोनाचे नियम धुडकावून कर्जत तालुक्यातील वंजारवाडी येथील अव्हिज व्हिलेज फार्महाऊसमध्ये आयोजित केलेली मुंबईतील उच्चभ्रू वस्तीतील पर्यटकांची पार्टी कर्जत पोलिसांनी उधळून लावली आहे. पोलिसांनी धाड टाकून केलेल्या या कारवाईत ३४ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

रायगड पोलीस अधीक्षक यांच्या आदेशानुसार आणि मार्गदर्शनाखाली कर्जत तालुक्यात ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तरीदेखील नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनांची तपासणी करून उल्लंघन करणाऱ्या पर्यटकांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उचलला जात आहे.

कर्जत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोरोना विषाणूचा संसर्ग होईल व सार्वजनिक सुरक्षा धोक्यात येईल, या कारणास्तव रायगड जिल्हाधिकारी यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यक्षेत्रात कोविड प्रतिबंधात्मक आदेश पारीत केले आहेत.असे असताना कर्जत तालुक्यातील वंजारवाडी येथील अविज व्हिलेज फार्महाऊस रेस्टॉरंट येथे पार्टी सुरु असल्याची गोपनीय माहिती सहायक पोलीस निरीक्षक संदिपान सोनावणे यांना मिळाली. याबाबत त्यांनी कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण भोर यांना कळवले.

कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल घेरडीकर यांच्या परवानगीने सहायक पोलीस निरीक्षक संदिपान सोनावणे यांनी कर्मचार्यांलना घेऊन वंजारवाडी येथील अविज व्हिलेज फार्महाऊस रेस्टॉरंटवर धाड टाकली. यावेळी तेथे भरपूर लोकांची गर्दी असलेली आढळून आले.

यात मुंबईतील उच्चभ्रू वस्तीतील एकूण ३४ तरुण-तरुणींचा समावेश असून, त्यांच्यावर कर्जत पोलीस ठाण्यात भा.द.वि. कलम १८८, २६९, २७०, २७१, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ अन्वये तसेच सिगारेट आणि तंबाखू उत्पादने अधिनियम २००३ कलम ४ आणि २१ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक अरुण भोर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक संदिपान सोनावणे हे करीत आहेत. दरम्यान, कर्जत पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईमुळे तालुक्यातील फार्महाऊस रेस्टॉरंट मालकांचे धाबे दणाणले आहेत.

# उरण तालुक्यातील ५ हजार ग्राहकांकडे महावितरणची पावणे नऊ कोटींची थकबाकी

## कारवाई टाळण्यासाठी ग्राहकांनी थकीत रकमेच्या भरणा करण्याचे महावितरणचे आवाहन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील पाच हजार ग्राहकांकडे महावितरणची पावणे नऊ कोटी रुपये थकीत आहेत. थकीत रकमेच्या वसुलीसाठी महावितरणची जोरदार मोहीम सुरू करण्यात आली असल्याची माहिती उरण तालुका महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता हरिदास चोंडे यांनी दिली आहे.




उरण तालुक्यात वाणिज्य, घरगुती आणि सार्वजनिक असे एकूण ५५ ते ५६ हजार ग्राहक आहेत. यापैकी पाच हजार ग्राहकांकडे महावितरणची पावणे नऊ कोटी रुपये थकीत आहेत. यामध्ये घरगुती, वाणिज्य आणि सार्वजनिक ग्राहकांचा समावेश आहे.वरिष्ठांच्या आदेशानंतर उरण महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता हरिदास चोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यात जोरदार थकित बिले वसुलीसाठी सक्तीची मोहीम हाती घेतली आहे.

यासाठी उरण तालुक्यातील जासई, चिरनेर, कोप्रोली, महालण, चाणजे विभाग व उरण शहर आणि उरण पश्चिम विभागातील नागाव,म्हतवली व केगाव विभागासाठी कर्मचाऱ्यांची वेगवेगळी पथके तयार करण्यात आली असल्याची माहिती चोंडे यांनी दिली आहे.थकबाकीदार ग्राहकांनी विजेचे बिल भरण्यास टाळाटाळ केली तर वीजपुरवठा खंडित करण्याच्याही सक्तीच्या सुचना कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या असल्याचेही चोंडे यांनी सांगितले.

वसुली अंतर्गत कारवाईपोटी आतापर्यंत जवळपास ५०० ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे.वीज वसुली अंतर्गत वीज चोरीच्याही अनेक केसेस दाखल केल्या आहेत. त्यामुळे केसेस दाखल झालेल्या अनेक ग्राहकांनी शेजारी, जवळपास असलेल्या घरातील मीटर मधुन वीज घेतली आहे. असे गैरप्रकार करु नये असे आवाहन करतानाच अशा ग्राहकांवरही विजचोरी, वीजपुरवठा खंडित करण्याचा इशारा चोंडे यांनी दिला आहे. नागरिकांनी वीजपुरवठा खंडित होण्याच्या कारवाईपासून वाचण्यासाठी तत्काळ वीजेच्या बिलांचा भरणा करावा असे आवाहन उरण महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता हरिदास चोंडे यांनी नागरिकांना केले आहे.

# मोहोटा देवी मंदिर परिसरात निसर्गप्रेमी महिलानी केले वृक्षारोपण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सध्या कोरोनाच संकट सर्व जगावर आलं आहे त्यावर सामना करत नागरिक कोरोनावर मात करत आपल्या उदरनिर्वाह करत जनजीवन सुरु असून सध्या निसर्गाशी मानव जात खेळत आहे प्रदूषण वाढत चालय त्यात झाडे तोडून टाकली जातात झाडापासून प्रदूषण कमी होऊन ऑक्सिजन वातावरणात येत असतो याची जाणीव लक्षात घेऊन पनवेल येथील महिला रिक्षा चालकांनी एकत्र येत झाडे लावण्याचा संकल्प केला.

रिक्षा व्यवसाय करत त्यातून महिलांनी थोडे थोडे पैसे जमा केले त्यातून झाडे खरेदी करून नवीन पनवेल येथील सेक्टर ५ मधील मोहोटा देवी (रेणुका माता )मंदिरा आवारात आयुर्वेदिक तसेच अनेक प्रकारची झाडे लावले तसेच निसर्ग टिकवण्या साठी आम्ही महिला जनजागृती करून नागरिकांना माहिती देऊ असे या वेळी महिलांनी सांगितले या वेळी सौ.ललीता राऊत , सौ. आशा घालमे, सौ.आश्विनी शितोळे, सौ.मनिषा देशमुख, सौ. वर्षा धरने , सौ.आणिता पाटील, सौ.जयश्री देशमुख, सौ.कमल घोलप, सौ.आणिता डावरे,सौ.सीमा नरोडो आदी उपस्थित होते.

# म्हसळ्यातील माहिला बचत गट गावासाठी लागणारी भाजी गावातच निर्मिती करणार

## जिल्हा परिषदेच्या उपक्रमाचे म्हसळ्यात कौतुक

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील महिला बचत गटाना जि. प. सेस फंड योजनेअंतर्गत भाजीपाला मिनीकिट्स वाटप रायगड जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती बबन मनवे यांच्या हस्ते करण्यात आले.



पंचायत समिती म्हसळा येथील सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला पंचायत समितीच्या सभापती छाया म्हात्रे, उप सभापती संदीप चाचले पं.स.सदस्य श्रीमती उज्वला सावंत व मधुकर गायकर, गट विकास अधिकारी वाय.एम.प्रभे, सहाय्यक गट विकास अधिकारी राजेश कदम, इंदुलकर, हेमंत माळी ग्रामपंचायत विस्तार आधिकारी सुनिल गायकवाड, अशोक बाक्कर व शिवाजी शिंदे, सरपंच अनिल बसवत उपस्थित होते. यावेळी तालुक्यातील एकुण महिला बचत गट ४६८ पैकी २५ बचतगटांना मिनीकिट्स वाटप केले. त्यामध्ये तोंडसुरे, वरवठ्णे, रेवली, खामगाव, खारगाव बु., पाभरे, काळसुरी, मेंदडी, चिखलप, तोराडी, देवघर व निगडी येथील महिला बचत गटाच्या प्रतिनिधी उपस्थित होत्या. यावेळी सरपंच, उपस्थित मान्यवरांनी म्हसळयाचे विद्यमान जिल्हा परिषद सदस्य आणि कृषी व पशुसंवर्धन सभापती बबन मनवे याचा आभ्यासू व कल्पकतेतून जिल्हा परिषद सेस फंड योजने अंतर्गत जिल्हयातील बहुतांश महिला बचत गटांना १००% अनुदानातुन भाजीपाला मिनी किट्सचे वाटप करण्यात आल्या. आता जिल्ह्यातील माहिला बचत गट गावासाठी लागणारी भाजी गावातच निर्मिती करणार ह्याचे श्रेय सभापती बबन मनवेना जाणार असल्याचे यावेळी आवर्जुन सांगितले. एच.एम.परकाळे विस्तार अधिकारी सांख्यिकी यांनी प्रास्ताविक केले. मंगेश साळी कृषी अधिकारी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पोलिस मित्र संघटनेची मुरुड कार्यकारिणी जाहीर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुंबई पोलीस मित्र संघटनेच्या नुकत्याच खारघर येथे आयोजित बैठकीत मुरुड तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून तालुकाध्यक्षपदी शुभम संतोष भोईर तर उपाध्यक्षपदी तन्मय जितेंद्र भाटकर यांची निवड करण्यात आली आहे.



नवीमुंबई-खारघर येथे दि.२७ जून रोजी पोलीस मित्र संघटनेची बैठक महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष राजेंद्र कपोते यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष रुपेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.कोरोना रोगाच्या पार्श्र्वभूमीवर शासनाच्या अटि शर्ती व नियमांचे पालन करण्यात येऊन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.यावेळी पोलीस मित्र संघटनेची मुरुड तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.यामध्ये तालुका संघटक म्हणून रुपेश हरिश्चंद्र रोटकर, तालुकाध्यक्ष पदी शुभम संतोष भोईर, उपाध्यक्षपदी तन्मय जितेंद्र भाटकर व सचिव पदी सुयोग संतोष भोईर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.जिल्हाध्यक्ष रुपेश पाटील यांच्या हस्ते नवनिर्वाचितांना यावेळी नियुक्ती पत्र देण्यात आले.निखेश घरत, सौरभ गोळे,तस्लिम कादीरी व उपस्थितांनी नवनिर्वाचितांचे अभिनंदन करुन पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कोकणातील करवंदे येणार आता मराठवाड्यात

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

बीड जिल्हयातील अभिमान खरसाडे हे पर्यावरणवादी कार्यकर्ते भीषण दुष्काळ व जंगलांची कमतरता असलेल्या मराठवाडा विभागात पर्यावरण संवर्धनाचे काम करतात. तिथे त्यांचा रायगड - कोकणातील करवंदाची झाडे वाढवण्याचा प्रयत्न आहे. आणि तसे आव-हन त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून केले होते. त्यानुसार त्यांना लागणाऱ्या करवंदाच्या बिया सुधागड तालुक्यातून नुकत्याच मोफत पाठविण्यात आल्या आहेत. आणि या बियांची लागवड तिथे करण्यात येत आहे.

याबाबत ज्यांना शक्य असेल त्यांनी बिया गोळा करून खरसाडे यांच्या पर्यंत पोहच करू आणि ते करीत असलेल्या कामाला थोडा हातभार लावू यात. असे आवाहन सिद्धेश्वरचे सरपंच उमेश यादव यांनी केले होते. त्यानुसार सिद्धेश्वर आदिवासी वाडी येथील आदिवासी समाजाचे पदाधिकारी कृष्णा वाघमारे यांनी विविध ठिकाणावरून काही बिया गोळा करून दिल्या. तसेच सीमा उमेश यादव यांनी काही बिया गोळा केल्या. आणि या जमलेल्या बिया पोस्टाने पाठवून दिल्या आहेत.

मराठवाड्या सारख्या भीषण दुष्काळी भागात अभिमान खरसाडे हे झाडे जगविण्यासाठी नवीन प्रयोग करीत आहेत. त्यांची यासाठी असलेली धडपड जाणवली आणि त्यांच्या या पर्यावरण संवर्धन कार्याला थोडासा हातभार लावावा या हेतूनं हे काम केले आहे. असे सरपंच उमेश यादव यांनी सांगितले. या बहुमूल्य सहकार्याबद्दल खरसाडे यांनी रायगड वासीयांचे आभार मानले.

# योगेश बामुगडे सरपंच सेवा महासंघाच्या रोहा तालुकाध्यक्षपदी नियुक्ती

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

सरपंच सेवा महासंघ महाराष्ट्र राज्य च्या रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील किल्ला ग्रामपंचायत येथील सरपंच योगेश बाळाराम बामुगडे यांची रोहा तालुकाध्यक्ष म्हणून नुकतीच नियुक्ती करण्यात आली. ही संघटना सरपंचाच्या न्याय व हक्कासाठी लढणारी महाराष्ट्रातील एकमेव नोंदणीकृत संघटना आहे. आज पर्यंत राज्य कार्यकारिणी ने शासनस्तरावर विविध मागण्या मंजूर करून घेतल्या हे उल्लेखनीय आहे.



रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील किल्ला ग्रामपंचायत पंचायत हि सर्वात मोठी समजली जाते, किल्ला येथील ग्रामपंचायत सरपंच योगेश बाळाराम बामुगडे त्यांच्या कामाचा संघटना वाढीसाठी अनुभव बघता त्यांच्या खांद्यावर रोहा तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी राज्य कार्यकारिणी च्या सल्लयानुसार सरपंच सेवा महासंघ संस्थापक राज्याध्यक्ष पुरुषोत्तम अंबादास घोगरे, राज्य संपर्कप्रमुख राहुल मारोतराव उके, रायगड जिल्हाध्यक्ष राजेंद्र टकले, कार्याध्यक्ष किशोर काजारे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देउन तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली . ते आपल्या नियुक्ती चे श्रेय सरपंच सेवा महासंघ महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक राज्याअध्यक्ष पुरुषोत्तम घोगरे, राज्य मानद अध्यक्ष चंद्रकांत बधाले, कार्याध्यक्ष माधवराव गंभीरे, राज्य संपर्कप्रमुख राहुल उके, कोअर कमिटी अध्यक्ष पंजाबराव चव्हाण, राज्य सल्लागार हनुमंत सुर्वे, राज्य संघटीका ज्योती अवघड, राज्य कार्यकारिणी सदस्य सतिश साखरे, भाऊसाहेब गिराम सोशल मीडिया प्रमुख भाऊसाहेब कळसकर, सरपंच माझा चे संचालक रामनाथ बोर्हाडे, रायगड जिल्हा अध्यक्ष राजेंद्र टकले, कार्याध्यक्ष किशोर काजारे, सरचिटणीस आशुतोष पाटील यांना देत आहे. त्यांच्या नियुक्ती मुळे सर्व स्तरातून अभिनंदन चा वर्षाव व स्वागत होत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम पंचक्रोशीतील जनतेला या नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिलांनी जमिनीचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

| गावाचे नांव | जमीन मालकाचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हेक्टर आर) | आकार |
|---|---|---|---|---|
| मोहो, ता.पनवेल, जि.रायगड | रोहनकुमार शंकर म्हात्रे | ३८/५ | ०-१०-०० पो.ख.०-०४-०० एकूण ०-१४-०० | ०.१४ |

या वरील मिळकतीचे मालकांशी आमचे अशिलांचा जमीन खरेदी करणेबाबत व्यवहार ठरलेला आहे. या मिळकतींशी कोणीही व्यक्ती, संस्था, बँक, सामाजिक संस्था यापैकी व इतर कोणाचाही कसलाही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत या त्याबाबत आम्हाला कळवावे. दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत नसल्यास कोणाचाही सदर मिळकतीत कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही व आमचे अशिलावरील नमूद मालकांशी सदर मिळकतीसंदर्भात ठरलेला खरेदीचा व्यवहार पूर्ण करू. मुदतीनंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दि.२९/०६/२०२१

ठिकाण : पनवेल

सही/-
अॅड.सतिश चं. काळे
३०६ गणेश टॉवर, मोठा खांदा
से.१७, पनवेल-४१०२०६
मो.नं.९८८१७८९८८८



श्री.भाकरे साो.कोर्ट

अॅड.अजित धनराज म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.६९५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०८/२०२१

१) श्रीमती.कमलावती सुरेश म्हात्रे
वय : ६३, धंदा : गृहिणी
२) श्री.सुरज सुरेश म्हात्रे
वय : ३५, धंदा : नोकरी
१ ते २ रा.घर नं.७८०, दत्त मंदिर जवळ,
ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.रंजनी हेमंत भोईर
वय : ३६, धंदा : गृहिणी
रा.मु.तुरमाळे, पो.शिरढोण,
ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.करिश्मा अमित म्हात्रे
वय : २९, धंदा : गृहिणी
रा.फुंडे, पो.बोकडविरा,
तालुका : उरण, जिल्हा : रायगड ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै. सुरेश चांगदेव म्हात्रे हे दि.१३/०२/२०२० रोजी मौजे : ओवळे, पो.पारगाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांच्या आई कै.द्रोपदी चांगदेव म्हात्रे या मयत असून त्यांच्या मृत्यूची तारीख अर्जदार यांना माहित नाही.

कै.सुरेश चांगदेव म्हात्रे यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मौजे : सिडको फाईल नं.उलवे-३६५**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| दापोली-८/८८ | ४२ | ३ | ०-३५-० |
| | ४३ | ३ | ०-२६-७ |
| | ६४ | ४+६ | ०-३४-०९ |
| | ११८ | ४ | ०-२२-५ |
| ओवळे-२/६ | ४८ | १ | ०-२१-० |
| | ५४ | ३ | ०-९३-० |
| | २४ | ४ | ०-२२-५ |
| कुंडेवहाळ-३९ | १० | ४ | ०-११-० |
| | २५ | ५ | ०-१६-७ |
| | ११ | १ | ०-५७-१ |
| ओवळे-२/६ | ५० | ० | ०-२३-० |
| | ५४ | १ | ०-६-० |
| | ५४ | १३ | ०-२३-० |
| | ७५ | २० | ०-२३-० |
| | २४ | ५ | ०-९-९ |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अॅवॉर्ड हा कै.सुरेश चांगदेव म्हात्रे यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे. सदर मिळकती मोबदल्यात सिडकोने खालीलप्रमाणे भूखंड देण्यात आले आहे.

| गाव | प्लॉट नं. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे | २५१ अे | १७ | १७०० चौ.मी. |

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.सुरेश चांगदेव म्हात्रे यांचे वारसदार या नात्याने कै.सुरेश चांगदेव म्हात्रे यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.सुरेश चांगदेव म्हात्रे यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २९/०६/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## दवाखान्यात जाते असे सांगून गेलेली विवाहिता घरी परतलीच नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वतःच्या मुलीला तु मावशीकडे जात मी वावंजे येथील सरकारी दवाखान्यात जावून येते असे सांगून घराबाहेर पडलेली एक विवाहिता अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रारी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.

सुनिता संजय जाधव (४० रा.सेक्टर २३ फेज २, तळोजा) उंची १६० से.मी. अंगाने मध्यम, रंग गोरा, चेहरा उभट, नाक सरळ, डोळे काळे, केस काळे, गळयात काळ्या रंगाचे मंगळसूत्र, कानात सोनेरी रंगाच्या रिंगा, उजव्या हातावर इंग्रजीत एस असे लिहिलेले असून अंगात हिरव्या रंगाची साडी, हिरव्या रंगाचा ब्लाऊज, पायात चांदीचे पैंजण, डाव्या हाताच्या पंजावर जखम असून तिला मराठी भाषा बोलता येते. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२४४४ किंवा सहा.पो.उपनिरीक्षक मनोहर चव्हाण यांच्याशी संपर्क साधावा.

## महाराज साम्राज्य संघ भारत संघटनेतर्फे कोलाड कुष्ठरोगी रुग्णांना फळ वाटप

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

महाराज साम्राज्य संघ भारत या संघटनेचे रायगड जिल्हा युवक कार्याध्यक्ष रुपेश मोहिते यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रविवार दि.२७ जून २०२१ रोजी कोलाड येथील कुष्ठरोगी रुग्णांना सामाजिक बांधिलकी राखत फळाचे पाटप करण्यात आले. यावेळी महाराज साम्राज्य संघ रायगड जिल्हाअध्यक्ष निलेश महाडिक,उपाध्यक्ष रोहित पवार, सरचिटणीस अनिकेत कांबळे,सपंर्क प्रमुख राजू सुतार, कार्याध्यक्ष रुपेश मोहिते,सल्लगार ज्ञानेश्वर जगताप, युवक संपर्क प्रमुख निलेश करंजे, प्रणय वाळंज,रायगड जिल्हा सोशल मीडिया अध्यक्ष शुभम म्हात्रे, उपाध्यक्ष हितेश तांबे,मनोज भोईर,नितेश सुतार, अक्षय खरोशे,विशाल शेलार प्रदीप पवार,सचिव सिद्धार्थ तांबे,रोहा तालुका अध्यक्ष प्रमोद गायकवाड,उपस्थित होते. या अगोदर रायगड जिल्हा महाराज सम्राज्य संघटनेचे अध्यक्ष निलेश महाडिक यांच्या निवास्थानी या संघटनेची सभा दुसऱ्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून मोठया उत्साही वाटावरणात संपन्न झाली.

## सुधागड तालुक्यात २२ कोरोना बाधित रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यात कोरोना कमी होण्याचे नाव घेत नाही. सोमवारी (ता.२८) २२ कोरोना बाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर ६ जणांनी कोरोनावर मात केली आहे. सध्या तालुक्यात कोरोनाचे १२५ सक्रिय रुग्ण आहेत अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली. तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे १४०६ रुग्ण झाले असून १२१९ रुग्ण बरे झाले आहेत. आणि तब्बल ६२ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

# कोटगाव प्रकल्पग्रस्त कृती सेवा संस्था ओएनजीसी विरोधात आंदोलन छेडणार

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील कोटगाव प्रकल्पग्रस्तांचा रेल्वेच्या आंदोलना पाठोपाठ आता ओएनजीसीच्या विरोधात मोर्चा काढण्यात येणार असून त्या संबंधिचे निवेदन ओएनजीसी प्रशासनानाला देण्यांत आले आहे.या मोर्चाच्या निवेदनाची प्रत उरणचे आ.महेश बालदी यांनाही देण्यात आली आहे.

कोटगावं प्रकल्पग्रस्त कृती सेवा संस्था ओएनजीसी विरोधात आंदोलन करणार अशा आशयाचे निवेदन ओएनजीसी व्यवस्थापनास देण्यात आले आहे. त्याच प्रमाणे मावळचे खासदार श्रीरंग बारणे, रायगड जिल्हाधिकारी, सहाय्यक पोलीसआयुक्त शेवा बंदर, उरण तहसिलदार,उरण पोलीस ठाणे आदींना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात असे नमूद केले आहे की, उरण ओएन जीसी प्रकल्पाकरिता गेल्या ४० वर्षा पूर्वी येथील शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने संपादित करण्यात



आल्या असून सदर संपादित जमिनीवर स्टोर हाउस गोदामे ओएनजीसी कॉलनी, सीआयएस एफ कॉलनी, रस्ते, पाईप लाईन अशा विविध स्वरूपाचे प्रकल्प तयार करण्यात आले.

परंतु अजतागायत आम्हा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सदर प्रकल्पामध्ये कोणत्याही स्वरूपात रोजगार किंवा कायमस्वरुपात नोकरी मिळालेली नाही. मागील २०१३ ते २०१५ या कालावधीत आमच्या प्रकल्प ग्रस्त संस्थेमार्फत चारफाटा उरण येथे आंदोलन करण्यात आले होते त्यावेळी कंपनी च्या कार्यालयीन आस्थापना सोबत ५ ते ६ बैठकीत चर्चा करण्यात आल्या व त्या बैठकीत असे आश्वासन देण्यात आले की पुढील येणाऱ्या कायम स्वरूपी भरती मध्ये आपल्या सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा विचार केला जाईल तसेच या बाबत वारंवार पत्राद्वारे आणि निवेदनाद्वारे पाठपुरावा चालु आहे. परंतु कंपनी आम्हा प्रकल्प ग्रस्त शेतकऱ्यांना केराची टोपली दाखविण्यात दाखविण्यात आली आहे .त्यामुळे प्रकल्प प्रस्तानमध्ये तिव्र नाराजीची भावना निर्माण झाली आहे.

तसेच रायगड जिल्हाधिकारी यांनी देखील ओएनजीसी कंपनी ला लेखी स्वरूपात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कायम स्वरुपी कंपनी आस्थापनामध्ये नोकर भरती करण्याचा विचार करावा अशा प्रकारचे निवेदन देऊन सुद्धा अजतागायत ओएनजीसी कंपनीने कोणत्याही प्रकल्प ग्रस्तला नोकरीत सामावून घेतले नाही. उलट ऑनलाईन प्रकारें भरतीचा बहाणा करून कंपनी चालढकलपणा करीत आहे. तरी आपण ह्या सदर प्रकरणाची शहानिशा करून आम्हा प्रकल्पग्रस्त शेतकरी व कंपनी आस्थापना सोबत येत्या १० ते १५ दिवसामध्ये बैठक घडवून आणावी. अन्यता जर अशाच प्रकारे आम्हा प्रकल्पग्रस्तांची फसवणूक करुन दिशाभूल केली जात असेल तर कंपनी च्या गेट समोर धरणे आंदोलन करण्या शिवाय आम्हा प्रकल्पग्रस्तां पुढे अन्य कोणताही पर्याय उरणार नाही याची आपण गंभीर्याने दखल घेऊन आम्हास न्याय मिळवून दयावा असे पत्राद्वारे कळविण्यात आले. अशा प्रकारचे निवेदन आ. महेश बालदी यांना देतांना कोटगावं प्रकल्पग्रस्त कृती सेवा संस्थाचे अध्यक्ष नवनित भोईर, सहसचिव हेमदास गोवारी, भाजपा तालुका अध्यक्ष रवि भोईर, खजिनदार, सुरज पाटील, महेश भोईर, नित्यानंद भोईर, भाजपा उरण तालुका ओ बीसी सेल अध्यक्ष हेमंत भोंबळे आदी उपस्थित होते.

## खांदा कॉलनी पाणी प्रश्नाबाबत शेकाप आक्रमक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा कॉलनी मधील अनियमित व कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा बाबत तसेच तीस वर्षापासूनची जुनी झालेली पाईप लाईन लवकरात लवकर बदलावी व वाढीवर टाक्या बांधून खांदा कॉलनीतील पाणी समस्या कायमस्वरूपी सोडवावी याबाबत शेतकरी कामगार पक्ष्याने आक्रमक भूमिका घेतली सिडको कार्यालय नवीन पनवेल येथे निवेदन देण्यासाठी शेकापचे शिष्टमंडळ गेले होते. परंतु शेकापचे कार्यकर्ते सिडको ऑफिस ला येणार आहेत याची अधिकार्यांना लागली होती कुणकुण सिडकोचे अधिकारी जागेवर नसल्याने शेकापचे पनवेल महापालिका जिल्हा कार्याध्यक्ष महादेव वाघमारे यांनी सिडकोच्या सहाय्यक अभियंत्याच्या दरव-ाजाला निवेदन चिकटवले.

खांदा कॉलनी शहरातील पाणी समस्या अत्यंत गंभीर होत चालली आहे अनेक सोसायट्यांमध्ये दहा दिवसांपासून पाणी येत नाही तसेच बर्यालच सोसायट्यांना कमी दाबाने पाणी येत आहे त्यामुळे सोसायटी धारकांना पाण्याचे टँकर विकत घ्यावे लागत आहे शेकापने काही सोसायट्यांना टँकर पुरवले आहेत पाणी प्रश्नाकबाबत सिडकोकडून तात्पुरती उपाययोजना केली जात आहे खांदा कॉलनीतील सेक्टर ६ व ११ या ठिकाणी सिडकोची पाणी साठवणूक टाक्या आहेत त्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे तरी सिडकोकडून वाढीव टाक्या बांधाव्यात तसेच खांदा कॉलनीतील तीस ते चाळीस वर्षापासूनची जुनी पाईपलाईन आहे ही पाईपलाईन लवकरात लवकर बदलावी अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाने केली आहे. गेल्या आठ दिवसापासून पाणी प्रश्नामबाबत खांदा कॉलनीतील नागरिक अतिशय त्रासलेले आहेत याबाबत ठोस भूमिका घेऊन खांदा कॉलनीतील नागरिकांची कायमस्वरूपी पाण्याची समस्या सोडवावी यासाठी शेकाप पनवेल महानगरपालिका जिल्हा कार्याध्यक्ष महादेव वाघमारे यांचे शिष्टमंडळ सिडको नविन पनवेल कार्यालयात निवेदन देण्यासाठी गेले असता सोबत माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, सागर भडांगे, अनिल बनकर, किरण घरत, योगेश कोठेकर, महेंद्र कांबळे, राजेश कांबळे, नलिनी जाधव, भारती मोहिते, किशोर पाटील पदाधिकारी उपस्थित होते.

## अवघ्या पंधरा दिवसात रस्त्याची वाताहात ; डांबरी रस्त्याला सिमेंट रेतीचा मुलामा

**दै.रायगड नगरी । उरण**

अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी नव्याने डांबरीकरण करण्यात आलेल्या खोपटापूल - कोप्रोली रस्त्याची वाताहत सुरू झाली आहे. या रस्त्याला जागोजागी खड्डे पडू लागले आहेत तर साईटचा रस्ता ही खचला आहे.रस्त्याच्या कामातील बोगसपणा लपविण्यासाठी ठेकेदाराने हे खड्डे सिमेंट रेतीचा मुलामा देऊन दुरुस्त करणे सुरू केले असले तरी या बोगस डांबरीकरणाची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

पूर्वी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे असलेला खोपटे पूल ते कोप्रोली रस्ता यावर्षी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ताब्यात घेऊन वाताहत झालेल्या या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तीन कोटींचा निधी मंजूर केला. या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम व्ही.एस.पाटील कन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यात आले. या ठेकेदाराने रस्त्यावर पडलेले खड्डे खडी व मातीने बुजविले व त्यावर ऑइल मिश्रित डांबराच्या बारीक खडीचा मुलामा देऊन रस्ता दुरुस्त केला.

रस्ता दिसायला चकाचक झाला असला तरी काही दिवसात रस्त्यावरील खडी बाहेर येऊ लागली. आतट तर रस्त्यावर जागोजागी खड्डे पडू लागल्याने ठेकेदाराचा कामातील बोगसपणा उघड होऊ लागला. त्यामुळे ठेकेदाराने डांबरी रस्त्यावरील खड्डे सिमेंट रेतीचा मुलामा देऊन बुजविण्यास सुरुवात केली आहे. फक्त पंधरा दिवसात करोड रुपयांचे डांबरीकरण उध्वस्त होत असेल तर या कामाची चौकशी करून या बोगस कामास पात्र प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यावरसुद्धा कारवाई करण्याची मागणी जनतेतून होऊ लागली आहे.

याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे कार्यकारी कनिष्ठ अभियंता प्रशांत फेंगडे यांना विचारणा केली असता मी सध्या सेमिनार मध्ये व्यस्त असल्याचे सांगून त्यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

मागील दुरुस्ती साठी ४२ लाख रुपये एन एच आय ने खर्च केले होते ते काम निकृष्ठ दर्जाचे होते आत्ताही या रस्त्यावर बी बी एम न मारता फक्त डांबरचा एकच लेअर मारला आहे त्यामुळे पहिल्या पावसातच हा रस्ता खचू लागला आहे. त्यामुळे या रस्त्याची चौकशी होणे गरजेचे आहे.

**अनंत ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते - खोपटे**



## संजय सेठी यांच्या हस्ते जेएनपीटीच्या मोबाईल एक्स-रे स्कॅनर्सचे उदघाटन



**दै.रायगड नगरी । उरण**

तंत्रज्ञानाच्या बाबतीत प्रगति व बंदराच्या एकूण कार्यक्षमते मध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने जेएनपीटीने एनएसआयसीटी व एपीएमटी येथे २ मोबाइल एक्स-रे स्कॅनर बसविले आहेत. या नवीन मोबाइल स्कॅनरचे उदघाटन जेएनपीटीचे अध्यक्ष श्री संजय सेठी व मुख्य कस्टम आयुक्त यू. निरंजन, जेएनसीएच यांनी बंदराचे भागधारक आणि व्यापार प्रतिनिधींच्या उपस्थितीत करण्यात आले.

जेएनपीटीने बंदरातील जेएनपीसीटी, डीपीवर्ल्ड आणि एपीएमटी या तीन टर्मिनल्ससाठी प्रत्येकी एक असे तीन मोबाइल कंटेनर स्कॅनर्स आयपीए मार्गे खरेदी करून स्थापित केले आहेत, ह्या साठी एकूण १०१ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या तीन स्कॅनर पैकी एक स्कॅनर ३० मार्च २०२१ रोजी कार्यान्वित झाला आहे. या व्यतिरिक्त, जेएनपीटीने बीएमसीटीपीएलसाठी एक ड्राइव्ह थ्रू कंटेनर स्कॅनर सुविधा सुरू केली आहे ज्यासाठी एकूण ४६.२५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. सध्या या प्रकल्पाचे ७५ टक्के काम पूर्ण झाले असून ते मार्च २०२२ पर्यंत कार्यान्वित होईल.

या नवीन मोबाइल कंटेनर स्कॅनरमुळे प्रति तास २० कंटेनर स्कॅन केले जातील पर्यायाने बंदराच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ होईल, ज्यायोगे आयात-निर्यात व्यापार वर्गाच्या मालाची जलद गतीने वाहतुक होण्यास मदत होईल. या नवीन मोबाइल स्कॅनरमुळे टर्मिनल आवारात असलेल्या कंटेनरची तपासणी करण्यास मदत होईल व यामुळे कंटेनर बंदरातून बाहेर पडण्या अगोदरच सुरक्षा यंत्रणांना योग्य ती कारवाई करता येईल. या सुविधेमुळे व्यापार वर्गाचा फायदा होणार आहे, कारण नवीन मोबाइल स्कॅनरद्वारे तपासणी झाल्यानंतर डीपीडी कंटेनर थेट बंदरातून बाहेर जाऊ शकतात. स्कॅनिंगची प्रक्रिया वेगवान असल्याने सर्व भागधारकांची वेळ व खर्चाची बचत होणार आहे.

या नवीन मोबाइल एक्स-रे स्कॅनर सुविधेमुळे टर्मिनलच्या आवारातील कंटेनर स्कॅन करता येतील व संबंधित कंटेनर बंदरातून बाहेर पडण्याअगोदरच सुरक्षा दलांना योग्य ती कारवाई करता येईल. या स्कॅनरमुळे आमच्या कार्यक्षमते मध्ये वाढ होण्यास व प्रत्येक टर्मिनलसाठी स्वतंत्र स्कॅनिंग सुविधा निर्माण केल्यामुळे आयातीचा ड्वेल टाइम कमी करण्यास मदत होईल. असे जेएनपीटी अध्यक्ष संजय सेठी यांनी या उदघाटन प्रसंगी म्हटले आहे.अशा प्रकारच्या उपाययोजनां केल्याने जेएनपीटीस तांत्रिकदृष्ट्या प्रगत जागतिक बंदरासमान बनविण्यास मदत होईल ज्यामुळे जगातील आघाडीच्या कंटेनर बंदरांमध्ये जेएनपीटीचे स्थान ऊंचावण्यास नक्कीच मदत होईल.असेही शेवटी संजय सेठी यांनी नमुद केले.


## जानेवारी २०२१ पासून पेट्रोल दर वाढीची हाफ सेंचुरी पुर्ण

### महागाईत प्रचंड वाढ, सर्वसामान्य जनतेला वाली कोण?

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

दिवसेंदिवस पेट्रोल दरात प्रचंड मोठ्या वाढ होत असून जानेवारी २०२१ पासुन आज पर्यंत त्याचे दर शंभर रुपयाच्या वर १०४,८७ रुपया वर गेला असुन ते दर अधिक वाढले जाण्याची दाट शक्यता असल्याने यामुळे महागाईत प्रचंड प्रमाणावर वाढ होत असून सर्वसामान्य जनतेला न परवडणारे आहे. सर्वसामान्य जनतेची यातून सुटका करण्यासाठी याला वाली कोण असा सवाल नागरिकांतून केला जात आहे.

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे दोन वर्षांपासुन सर्वत्र लॉक डाऊन करण्यात आला. यामुळे अनेक व्यवसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे.तर अनेकांना आपल्या नोकऱ्या गमवाया लागल्या आहेत. अशातच पेट्रोल व डिझल वाढीमुळे महागाईने कळस



गाठला आहे. तर पेट्रोलचे दर १०४.८७ रुपयांच्यावर गेल्याने दिवसभर काम करुन तीनशे रुपये कमवणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना टुव्हीलर गाडी सर्व्हिसिंग व पेट्रोल हे न परवडणारे आहे. तसेच पेट्रोल व डिझल दरवाढीमुळे माल वाहतुकीचा खर्च वाढला आहे यामुळे कडधान्य, भाजीपाला व इतर जिवनावश्यक वास्तुच्या किंमतीत प्रचंड प्रमाणात वाढ होतांना दिसत आहे.

याशिवाय दिवसेंदिवस एसटी भाडे, रिक्षा भाडे, व इतर वाहतूक करणाऱ्या वाहनाच्या भाडयात वाढ झाली आहे. याच बरोबर स्वयंपाक गॅसच्या किमतीत वाढ झाली आहे. यामुळे हे सर्वसामान्य जनतेला न परवडणारे आहे. अगोदरच कोरोना महामारी व चक्रीवादळ यामुळे हैराण झालेली जनता कसेबसे आपले कुटुंब सावरत आहेत. शासकीय लोकांच्या महागाई भत्त्यात वाढ केली जाते. परंतु रोजमदारीवर व महिना आठ ते नऊ हजार रुपयावर काम करणाऱ्या जनतेला आपले जिवन जगणे कठीण झाले असुन यांना वाली कोण असा सवाल जनतेतून केला जात आहे.

## नगरसेवक विकास घरत यांच्या आक्रमकतेनंतर सिडकोने केली कामाला सुरुवात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीमधील सेक्टर ३४ मधील नागरिकांना अनेक समस्या भेडसावत आहेत.येथील सांड पाणी वाहून नेणार्याक वाहिन्या जीर्ण झाल्याने टाक्या मलमुत्राने ओथंबून वहात आहेत.याची तक्रार करून सुध्दा समस्या जैसे थे असल्याचे पाहून नगरसेवक विकास घरत आक्रमक झाले होते व रहिवाशांच्या सह थेट सिडको कार्यालयात धडक देत त्यांनी अधिकार्यांना फैलावर घेताच कामे मार्गी लागली असून सिडकोचे अधिकारी व कर्मचारी आता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरुन कामे करू लागली आहेत.

सांड पाण्याच्या टाक्या सेक्टर ३४ परिसरात वाहत असल्याने अतिशय दुर्गंधी पसरलेली होती. त्यावर घोंगावणार्या माशा आणि २४ तास वाहणारे सांडपाणी यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न् निर्माण झाला होता. हेच पाणी पिण्याच्या पाण्यात देखील मिसळते त्यामुळे रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला होता. याशिवाय येथील चेंबर वरची झाकणे नाहीशी झाली आहेत,पदपथ अपूर्ण अवस्थेत होती. अशा सगळ्या समस्यांसाठी नागरिकांनी तक्रारी करून, नगरसेवक विकास घरत यांनी पाठपुरावा करून देखील कामे होत नसतील तर त्यांना रुद्रावतार धारण करावा लागला.

काही दिवसापूर्वी येथील समस्याग्रस्त नागरिकांना घेऊन त्यांनी कामोठे सिडको कम्युनिटी सेंटरमध्ये कार्यकारी अभियंता विलास बनकर यांची भेट घेतली होती. आठ दिवसात नवीन पाईप टाकण्याचे काम सुरू होईल.तोपर्यंत जेट मशीन,आणि सक्शन मशीन द्वारे टाक्या साफ केल्या जातील, असे आश्वोसन त्यांनी दिले होते. व त्या आश्वा सनाची पुर्तता करत सिडकोने प्रत्यक्ष कामाला सुरूवात केल्याने स्थानिक रहिवाशांनी नगरसेवक विकास घरत यांचे आभार मानले आहेत.

## गांजा सेवन करणाऱ्या विरोधात तालुका पोलिसांनी केली कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बेकायदेशीररित्या गांजा सेवन केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे वपोनि रवींद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने एका व्यक्तीविरोधात कारवाई केली आहे.

तालुक्यातील कसळखंड येथील नवकार लॉजिस्टीक कंपनीच्या लेबर कॅम्पच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत दिपक पासवान (२७) हा गांजा या प्रतिबंधक अंमली पदार्थाचे सेवन करीत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक (गुन्हे) अंकुश खेडकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पो.निरीक्षक विजय खेडकर, नितीन पगार, सुनील कारोटे, पोलीस शिपाई राजकुमार सोनकांबळे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून त्या इसमाला ताब्यात घेतले आहे.